**एका महिला उद्योजिकेच्या आयुष्यातील एक दिवस**

**रुपाली पवनीकर**

मी पुण्यात राहते. माझ्या कुटुंबात माझे पती, दोन मुले, सासू-सासरे आणि दीर एवढी माणसे आहेत. माझे पती आणि मी मिळून टी-शर्ट बनवण्याचा व्यवसाय करतो. आमच्या घराच्या पहिल्या मजल्यावर आमचा छोटा कारखाना आहे. एकूण १० मशीन आहेत. दर महिन्याला आम्ही ३००० टी-शर्ट बनवतो, आणि वर्षभरात स्पोर्ट्सचे व गणवेषाचे ७००० टी-शर्ट बनवतो. मला 'माणदेशी' या संस्थेकडून आर्थिक मदत मिळते. मी त्या संस्थेची सभासद आहे. पुणे-मुंबईत होणाऱ्या त्यांच्या प्रदर्शनात आमचे टी-शर्ट आम्ही नेहमी विक्रीला ठेवायचो. तिथेच आम्हाला कंपन्यांच्या ऑर्डरसुद्धा मिळायच्या.

कोविड-१९ मुळे मात्र अचानक आमचा धंदा बंद पडला. लॉकडाऊन चालू असल्यामुळे टी-शर्ट विकण्याचा काहीच मार्ग राहिला नाही. एका रात्रीत आमचे चित्र बदलून गेले - चांगला चालणारा धंदा बंद होऊन हातात पैसेच नाहीत अशी स्थिती आली. मग मी आमच्याकडच्या कापडाचे मास्क बनवून घराजवळच्या रस्त्यावर एक मास्क २५ रुपयाला विकायला सुरुवात केली. असे दोन आठवडे गेले, आणि मला 'माणदेशी'च्या अनिताताईंचा फोन आला. त्या म्हणाल्या, रोज १०-१२ मास्क बनवून विकण्यापेक्षा तुझ्या कारखान्यातल्या मशीनवर कापडाची कटिंग करून आपण मोठ्या प्रमाणावर मास्क बनवू शकतो. त्यांनी मला इतर काही महिलांची ओळख करून दिली, आणि त्यांना सोबत घेऊन मी चांगल्या दर्जाचे मास्क बनवायला सुरुवात केली. अशा प्रकारचे काम करू शकणाऱ्या महिलांना गोळा करण्यासाठी 'माणदेशी' संस्थेने पेपरमध्ये जाहिरात दिली आणि त्यांच्या ओळखीच्या लोकांनाही सांगितले. महिलांनी संस्थेत संपर्क केला, की तिथून त्या माझ्याकडे कामाला पाठवून द्यायच्या.

सुरुवातीला तीन बायका होत्या. आता तीस बायका आहेत. दीड महिन्यापूर्वी कामाला सुरुवात केली तेव्हापासून आतापर्यंत एक लाखाहून जास्त मास्क आम्ही विकले आहेत! लॉकडाऊन चालू असल्यामुळे आणि शारीरिक अंतर राखायचे असल्यामुळे मी त्या बायकांना कारखान्यात यायला सांगत नाही. त्या स्वतःच्या घरीच हे मास्क शिवतात.

**वेळ : सकाळी ८.३०**

घरातली सर्व कामे उरकून मी 'माणदेशी'च्या ऑफिसमध्ये अनिताताईंना फोन करते. आज किती मास्क बनवायचे आहेत हे त्या सांगतात - त्यातले किती एक पदरी, किती दुपदरी आणि किती तीन पदरी असतील, त्याप्रमाणे कटिंग करून ठेवायला सांगतात. 'माणदेशी' संस्थेने या मास्कच्या विक्री आणि वितरणाची जबाबदारी घेतली आहे. मोठ्या कंपन्या, मुंबईतली सरकारी ऑफिसेस, पुण्यातल्या काही संस्था,

हाऊसिंग सोसायटी अशा अनेक ठिकाणी हे मास्क विकले जातात. मास्क बनवण्यासाठी लागणारे कापड 'माणदेशी' संस्थेतूनच मला मिळते.

**वेळ : सकाळी ११.००**

शिलाईचे काम करणाऱ्या बायका त्यांनी शिवलेले मास्क द्यायला माझ्या घरी येतात. मी कटिंग करून ठेवलेले कापड त्या शिलाई करण्यासाठी घरी घेऊन जातात. माझ्याकडे येताना त्या स्वतः मास्क लावूनच येण्याची खबरदारी घेतात. त्या आल्या की पहिल्यांदा मी त्यांना सॅनिटायझर लावायला देते, आणि मीसुद्धा मास्क आणि हातमोजे घालूनच त्यांच्यासोबत देवाणघेवाण करते.

माझ्या दिवसभराच्या इतर कामांची यादी लक्षात घेऊन मी या बायकांना फक्त ११ ते १ या वेळातच यायला सांगितले आहे. त्यांना समजा काही कारणामुळे घराबाहेर पडता आले नाही, तर कटिंग केलेले कापड मीच त्यांच्या घरी नेऊन देते. माझा येण्या-जाण्याचा प्रवासखर्च भरून निघावा म्हणून मी त्यांच्याकडून ५० पैसे प्रति मास्क या दराने पैसे घेते. साधारणपणे एका दिवसात एक बाई १०० मास्क शिवते. म्हणजे माझ्यासोबत काम करणाऱ्या ३० जणी एका दिवसात ३००० मास्क तयार करतात. मी प्रत्येक मास्कची शिलाई आणि घडण व्यवस्थित झाली आहे की नाही याची स्वतः खात्री करून घेते.

सुरुवातीला बऱ्याच मास्कची घडण नीट नसायची. जे मास्क दुपदरी आणि तीन पदरी आहेत, त्यांची घडण फार काळजीपूर्वक करावी लागते, कारण कापडाचे दोन-तीन तुकडे एकावर एक व्यवस्थित बसवून घ्यावे लागतात आणि मग शिवावे लागतात. हे सर्व नीट कसे करायचे त्याची पद्धत दाखवणाऱ्या व्हिडियो मी त्या बायकांना whatsapp वरून पाठवायला सुरुवात केली. मग त्यांच्या शिलाईच्या दर्जामध्ये लक्षणीय फरक पडला.

**वेळ : दुपारी १.००**

'माणदेशी' चे ऑफिस माझ्या घरापासून पाच मिनिटाच्या अंतरावर आहे. तयार असलेले मास्क मी तिकडे नेऊन देते. तिथे सर्व मास्कची तपासणी आणि विभागणी करून त्या मला ऑनलाईन पैसे पाठवतात. मग मी शिलाई करणाऱ्या बायकांना पैसे देते. त्यांनी किती मास्क शिवले त्यानुसार आठवड्यातून एकदा मी त्यांचे मानधन 'गूगल पे' किंवा 'पे टीएम' च्या माध्यमातून त्यांच्याकडे पाठवते. जर कोणाकडे स्मार्टफोन नसेल, तर त्या शिवलेले मास्क द्यायला घरी येतात तेव्हा मी त्यांना रोख पैसे देते.

या बायकांना प्रत्येक मास्कचे ५ रुपये मिळतात. एका दिवसात त्या १०० मास्क शिवतात, त्यामुळे त्यांना दिवसाचे ५०० रुपये मिळतात. पूर्वी या बायका स्वयंपाकाची किंवा घरगुती कामे करायच्या, भाजी विक्री,

ब्युटी पार्लर किंवा छोटे कारखाने अशा ठिकाणी कामे करायच्या. लॉकडाऊन सुरू झाल्यापासून त्यांना इतर काही कमाई नाही, त्यामुळे आता त्यांना मिळणारे हे मानधन खूप महत्त्वाचे आहे.

**वेळ : दुपारी २.००**

जेवण झाल्यावर मी माझ्या वाटणीचे मास्क शिवायला घेते. माझा सर्व वेळ या कामातच जात असल्यामुळे घरातली कामे माझे कुटुंबीयच करतात. मी साधारण रात्री ८ वाजेपर्यंत काम करते. तेवढ्या वेळात माझे ५० मास्क शिवून होतात.

**वेळ : रात्री ९.००**

कापडाची कटिंग करण्यासाठी माझे पती आणि मी मिळून मशीन चालू करतो. रात्री ९ वाजल्यापासून २ वाजेपर्यंत आम्ही हे काम करतो. हे काम खूप कौशल्याचे आहे, आणि काळजीपूर्वक करावे लागते. कापडाचे पदर नीट ताणून मशीनवर बसवावे लागतात, त्यांना घड्या पडलेल्या चालत नाहीत; नाहीतर मास्कचे पदर वाकडेतिकडे कापले जातात आणि मास्क वापरता येत नाही. म्हणून आम्ही हे काम मुद्दाम रात्री करतो, कारण रात्रीच्या शांत वेळी एकाग्रतेने लक्षपूर्वक काम करता येते. रोज रात्री साधारण ५००० तुकडे कापून होतात. दुसऱ्या दिवशी बायका येतील तेव्हा त्यांना द्यायला मी ते तयार ठेवते.

कटिंग करण्यासाठी प्रत्येक तुकड्याचे ७५ पैसे माणदेशी संस्थेकडून मिळतात. गेल्या ६ आठवड्यात माझे पती आणि मी मिळून जवळजवळ ९०,००० तुकडे कापले, आणि त्याचे आम्हाला ६७,५०० रुपये मिळाले. शिवाय मी ५० मास्क रोज शिवते त्याचे २५० रुपये मिळतात ते वेगळेच.

दरवर्षी एप्रिल-मे महिन्यात आम्हाला शाळेच्या गणवेषांच्या ऑर्डरी मिळतात. पण यावर्षी शाळा कधी चालू होणार ते निश्चित नसल्यामुळे अशा ऑर्डरी मिळालेल्या नाहीत. आम्ही त्या गणवेषांच्या कापडाची ऑर्डर देऊन ठेवली आणि पैसेसुद्धा दिले होते. पण लॉकडाऊन सुरू झाल्यामुळे कापड आमच्याकडे अजून आलेले नाही. हे मास्क बनवण्याचे काम मिळाले नसते, तर आमची आर्थिक परिस्थिती अगदी हलाखीची झाली असती.

आता शाळेच्या गणवेषांचे काम सुरू झाले तरी मी मास्कचा बिझनेस चालूच ठेवणार आहे. मला खूप कष्ट करावे लागतील, पण मी ही दोन्ही कामे पुढे चालू ठेवीन.

**रुपाली पवनीकर** या एक महिला उद्योजक आहेत. पुण्यात त्या टी-शर्ट बनवण्याचा व्यवसाय करतात. त्यांच्या कुटुंबात काही आकस्मिक वैद्यकीय खर्चाचा प्रसंग उद्भवला तेव्हा कुटुंबाला आर्थिक हातभार

लावण्यासाठी त्यांनी शिवणकाम सुरू केले. ‘माणदेशी’ या संस्थेकडून कर्ज घेऊन त्यांनी शिलाई मशीन विकत घेतले. हळूहळू त्यांनी काम वाढवत नेले, आणि आज त्या टी-शर्ट आणि स्पोर्ट्सचे कपडे बनवण्याचा व्यवसाय चालवतात. ‘माणदेशी उद्योगिनी’ हा पुरस्कार त्यांना मिळाला आहे, आणि त्या इतर महिला उद्योजकांना मार्गदर्शनही करतात.